मराठी साप्ताहिक
# युवाशक्ती एक्सप्रेस



सौ. रुबिना मुल्ला
कार्यकारी संपादिका
मो-९८९०८७९७५७

RNI No. MAHMAR/2016/72543

वर्ष ७ वे | अंक : ०१ | रविवार ०६ एप्रिल ते १२ एप्रिल २०२५ | किंमत रू. १/- | पृष्ठ : ४

पान २ संपादकीय — कामराविरोधातच की अन्य काही...

पान ३ — अंगावर पांढरं जाणं म्हणजे काय?

पान ४ — ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांचे निधन

## वसईतील पत्रकारांचे आंदोलन यशस्वी..

वसई : वसई-विरार महापालिकेने पत्रकारांच्या मालमत्ताकराची थकबाकी असल्याची चुकीची यादी प्रसिद्ध केल्याचे तीव्र पडसाद पत्रकारांमध्ये उमटले. बुधवारी पत्रकारांनी दोन तास पालिका मुख्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन केले. अखेर अतिरिक्त आयुक्तांनी पत्रकारांच्या आंदोलनस्थळी भेट देऊन चर्चा केली आणि झालेल्या प्रकाराबाबत दिलगिरी व्यक्त केली. वसई-विरारमधील पत्रकारांनी एकत्र येऊन आपल्या आत्मसन्मानाचा हा लढा यशस्वी करून दाखवला.

वसई-विरार महापालिकेने मालमत्ता कराची थकबाकी दाखविणारी पत्रकारांची यादी प्रसिद्ध केली होती. ही यादी समाजमाध्यमांवर व्हायरल झाली होती. ज्या पत्रकारांनी मामलत्ता कराचा भरणा केला आहे त्यांची नावे त्यात होती. ज्या मालमत्ता पत्रकारांच्या नाही त्या देखील पत्रकारांच्या दाखविण्यात आली होती. त्यामुळे समाजात पत्रकारांबाबत चुकीचा संदेश गेला आणि बदनामी झाली होती. याचा निषेध



करण्यासाठी बुधवारी सर्व पत्रकारांनी पालिका मुख्यालयावर आंदोलन केले. सर्व पत्रकारांच्या संघटना, स्थानिक वृत्तपत्रे, युट्यूब चॅनेल्सचे पत्रकार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दुपारी १२ पासून हे आंदोलन सुरू होते. पोलिसांनी मुख्यालयाचे प्रवेशद्वार बंद केल्याने पत्रकारांनी प्रवेशद्वाराबाहेरच ठिय्या आंदोलन केले. उपायुक्त (आस्थापना) सदानंद गुरव आणि उपायुक्त समीर भूमकर (कर) यांनी पत्रकारांच्या

पान नं. 2

## शिक्षण व आरोग्य यांच्याकडे प्राधान्याने लक्ष; नवनियुक्त जिल्हाधिकारी डॉ. इंदूराणी जाखर यांचे प्रतिपादन

**प्रशासकीय कामकाजातील आपल्या अनुभवाची माहिती देऊन प्रथमदर्शनी जिल्ह्यात प्राधान्याने करावयाच्या कामांबाबत माहिती दिली.**

पालघर : पालघर जिल्ह्यात राष्ट्रीय महत्त्वाचे अनेक प्रकल्प सुरू असून प्रकल्पाच्या नियोजनाचे टप्पे अभ्यास करून पावसाळ्यापूर्वी करावयाच्या कामांवर आपण लक्ष देणार असून शिक्षण व आरोग्य या विभागाकडे प्राधान्याने लक्ष देऊ असे पालघरच्या नवनियुक्त जिल्हाधिकारी डॉ. इंदूराणी जाखर यांनी प्रतिपादन केले.पालघर जिल्हाधिकारी पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. प्रशासकीय कामकाजातील आपल्या अनुभवाची माहिती देऊन प्रथमदर्शनी जिल्ह्यात



प्राधान्याने करावयाच्या कामांबाबत माहिती दिली. यावेळी त्यांच्यासोबत अतिरिक्त जिल्हाधिकारी भाऊसाहेब फटांगळे,
निवासी उपजिल्हाधिकारी

पान नं २

## जनसुरक्षा कायद्याविरोधात पत्रकार संघटनांची तीव्र निदर्शन..

मुंबई :- राज्य सरकारच्या नव्या अभिव्यक्ती स्वातंत्र्य कायद्याविरोधात राज्यातील पत्रकार संघटनांनी तीव्र विरोध दर्शवत मुंबई मराठी पत्रकार संघ येथे पत्रकार अभिव्यक्ती संरक्षण मंचाच्या माध्यमातून निदर्शने केली. हा कायदा माध्यमांच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारा असल्याचा आरोप यावेळी सर्व पत्रकारांनी केला असून, त्वरित तो मागे घेण्याची मागणी केली आहे. अन्यथा यापुढील आंदोलन तीव्र करू असा इशारा दिला.

मुंबईतील आझाद मैदान जवळ असलेल्या पत्रकार




संघाच्या आवारातून रॅली काढत पत्रकारांनी निषेध व्यक्त करत आपली भूमिका मांडली. मुंबई मराठी पत्रकार संघ, मराठी पत्रकार परिषद, मुंबई प्रेस क्लब , मंत्रालय आणि विधीमंडळ वार्ताहर संघ, टीव्ही जर्नालिस्ट असोसिएशन, पुणे श्रमिक पत्रकार संघ, बृहन्मुंबई युनियन ऑफ जर्नालिस्ट, बृहन्मुंबई महानगरपालिका वार्ताहर संघ , मुंबई क्राईम रिपोर्टर असोसिएशन, मुंबई हिंदी पत्रकार संघ याचे अध्यक्ष पदाधिकारा

पान नं २

## वसई तालुक्यातील रस्ते हे मृत्यूचे सापळे बनलेले आहेत :–समीर सुभाष वर्तक

महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेस कमिटीच्या पर्यावरण विभागाचे प्रदेश अध्यक्ष आणि माजी जिल्हा परिषद सदस्य समीर सुभाष वर्तक यांनी वसई विरार शहर महानगरपालिकेचे आयुक्त अनिल पवार यांना भेटून महानगरपालिकेच्या माध्यमातून अमृत - 2 या योजनेच्या जलवाहिन्या टाकण्याचे जे काम चालू आहे त्यामुळे संपूर्ण वसई तालुक्यातील रस्ते हे मृत्यूचे सापळे बनलेले आहेत त्यामुळे काम पूर्ण झाल्यावरती त्वरित रस्ते पूर्ववत करण्या बाबत लेखी पत्राद्वारे कळविले आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपाभियंता संजय यादव यांनाही पत्राद्वारे कळविले आहे.वसई विरार शहर महानगरपालिकेच्या माध्यमातून अमृत-2 या योजनेअंतर्गत संपूर्ण वसई तालुक्यात जलवाहिन्या टाकण्याचे काम चालू आहे. परंतु जलवाहिन्या टाकून झाल्यानंतर रस्तेपूर्वकरत करण्यासंदर्भात ठेकेदाराकडून चालढकल करण्यात येत आहे

पान नं २

# संपादकीय...!

## कामराविरोधातच की अन्य काही...

गद्दार या शब्दाने महाराष्ट्राचे राजकारण ढवळून निघाले आहे. खरे तर यापेक्षा जहरी टिका महाराष्ट्रातल्या नेत्यांवर अत्रेंसारख्या पत्रकारांनी किंवा बाळासाहेब ठाकरेंसारख्या राजकीय नेत्यांनी केलेली आहे. या अशा टिकेला आपल्या कामाने उत्तर देत महाराष्ट्राचे राजकारण घडले आहे. कामरा जे बोलला तेच इतर बोलत होते. त्या इतरांवरचा राग कामरावर निघाला का?गद्दार या शब्दाने महाराष्ट्राचे राजकारण ढवळून निघाले आहे. खरे तर यापेक्षा जहरी टिका महाराष्ट्रातल्या नेत्यांवर अत्रेंसारख्या पत्रकारांनी किंवा बाळासाहेब ठाकरेंसारख्या राजकीय नेत्यांनी केलेली आहे. या अशा टिकेला आपल्या कामाने उत्तर देत महाराष्ट्राचे राजकारण घडले आहे. कामरा जे बोलला तेच इतर बोलत होते. त्या इतरांवरचा राग कामरावर निघाला का?

काही दिवसांपूर्वी 'गद्दार' हा शब्द उद्धव ठाकरे यांचे नेतृत्व मानणारे शिवसैनिक व त्यांच्या पक्षातले काही वरिष्ठ सहकारी वापरायचे. ते तो शब्द का वापरायचे, कोणाविरोधात वापरायचे याची उजळणी करण्याची आवश्यकता नाही. पण तोच शब्द उच्चभ्रू वर्गात विनोद, विडंबनपर कार्यक्रम करणाऱ्या कुणाल कामरा नावाच्या व्यक्तीने वापरताच राज्यभरच नव्हे, तर देशभर तो चर्चेचा विषय बनला आहे.एरवी हा विषय इतका मोठा झालाही नसता आणि कुणाल कामरा हे नावही घरोघरी पोहोचले नसते. तसेही कामरा याने त्याच्या कार्यक्रमात कोणाचा थेट नामोल्लेख केलेला नाही. पण ते सर्व मुद्दाम, सुपारी घेऊन केले गेले आहे, असे म्हणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे समर्थक फारच हळवे झाल्याने व महाराष्ट्र सरकारने कामराच्या विधानांची गंभीर दखल घेतल्याने हा पराक्रम घडून आला आहे. राजकीय नेते, पक्ष यांच्यावर टीका करण्याचा सामान्य जनतेला अधिकार आहे की नाही, लोकशाही व्यवस्थेत असे काही करता येते की नाही, इथपर्यंत या विषयाची चर्चा पोहोचली आहे.कोणी कोणता शब्द वापरावा आणि त्यामुळे राजकारणातल्या व्यक्तींनी दुःखी-कष्टी व्हावे की नाही हा विषय व्यक्तिपरत्वे ठरतो. पण सध्याचा काळच वेगळा आहे. आपल्याविरोधात बोलणारे आपले वैयक्तिक हितशत्रू आहेत, असा समज करून घेण्याकडे कल वाढू लागला आहे. एखादा आपल्या सार्वजनिक जीवनाविषयी, घेतलेल्या भूमिकेविषयी टिप्पणी करत असेल तर तो आपला वैयक्तिक शत्रू ठरत नाही. आपण आपले काम आपल्या ताकदीवर करत रहावे, म्हणू देत लोक काय म्हणायचेत ते, असा पवित्रा घेतला तर अनेक गोष्टी सोप्या होतील. पण..असो!प्रथम गद्दार या शब्दाविषयी. हा शब्द महाराष्ट्राच्या राजकारणात नवा मुळीच नाही. तो शब्द काहीसा उथळ असला तरी तो अन्य कोणाविरोधात वापरला गेला असावा, याचा इतिहास काढला तर धक्काच बसतो. दिवंगत यशवंतराव चव्हाण यांची द्वैभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून १९५६ मध्ये निवड झाली तेव्हा त्यांना केवळ मोरारजी देसाई यांचे पित्तू, संयुक्त महाराष्ट्राचे मारेकरी, महाराष्ट्रद्रोही एवढीच विशेषणे, दुषणे लावली गेली नाहीत तर त्यांच्यासाठी 'गद्दार' हा शब्दही वापरला गेला. दिवंगत ज्येष्ठ पत्रकार, लेखक अरुण साधू यांनी याबद्दल लिहिले आहे. अशी विशेषणे लावल्याने चव्हाण यांचे राजकारणातले स्थान मुळीच डळमळीत झाले नाही. पुढे त्यांनी आपला स्वभाव, कर्तृत्व याच्या जोरावर अनेक लोक जोडले व आपले स्थान अढळ ठेवले.आचार्य अत्रे एखाद्याबद्दल काय बोलत किंवा लिहित हे ऐकले, वाचले तर जीवंतपणी मरणयातना व्हाव्यात इतकी त्यांची टीका तिखट आणि धारधार असे. केवळ दिवंगत चव्हाणच नव्हे, तर दिवंगत मुख्यमंत्री मा. स. कन्नमवार, मुंबईचे अनभिषिक्त सम्राट म्हणून ओळखले गेलेले स. का. पाटील यांच्यावर टीका करताना अत्रे काय काय बोललेले नाहीत? महाराष्ट्राच्या विरोधात जो भूमिका घेईल त्याविरोधात आसमंत दणाणून जावा इतके ते बरसत. दै. मराठामधील त्यांचे अग्रलेख, लेख जळजळीत असत. पण म्हणून ना नेते डगमगले ना त्यांनी अत्रेंना छळले.दिवंगत बाळासाहेब ठाकरे हे तर जातिवंत व्यंगचित्रकार. त्यांच्या कुंचल्याचे, लेखणीचे फटकारे अनेकांना बसले. पुढे त्यांनी कुंचल्याचा वापर कमी केला. नेते म्हणून त्यांच्या वाणीचे फटकारे अनेकांना बसले. शरद पवार यांच्याविषयी त्यांनी काय काय शब्द वापरले नाहीत? कब्जा कलुषी, मैद्याचे पोते वगैरे वगैरे. पण त्यामुळे पवार फार हळवे झाले असे कधी दिसले नाही. त्यांचे राजकारण त्यांनी त्यांच्या पद्धतीनेच केले. छगन भुजबळ शिवसेना सोडून गेले तेव्हा लखोबा लोखंडे हा शब्दप्रयोग शिवसैनिकांकडून अनेक वर्षे होत राहिला. पण भुजबळ डगमगले असे काही दिसले नाही. आजही ते राजकारणात आपल्या सामर्थ्यावर टिकून आहेत.

मत व्यक्त करण्याचा अधिकार फक्त राजकारणातल्या व्यक्तींनाच किंवा पत्रकारितेला आहे, असेही नाही. अलीकडे जाहीर सभांमध्ये मध्येच कोणीतरी उठून काही टोकदार प्रश्न विचारतो. कोणाला दुष्काळासाठी जाहीर झालेली मदत मिळालेली नसते, कोणाला रोजगारावर काही विचारायचे असते, कोणी शेतमालाला चांगला दर जाहीर होऊनही खरेदी का होत नाही, असे विचारतो. त्यावर काही समंजस नेते व्यवस्थित उत्तर देतात, पण काही प्रचंड भडकतात. आपल्याला असा प्रश्न विचारलाच कसा जाऊ शकतो, असे त्यांना वाटते. आणि हा कोण आहे, कोणत्या पक्षाचा आहे वगैरे माहिती काढा म्हणतात. पोलीससुद्धा आपल्याला जणू आव्हानच दिले गेले आहे अशा थाटात त्या व्यक्तीकडे धावतात. हे कोणत्या नियमाने, कायद्याने? सामान्य माणूस कःपदार्थ आहे? तो सभा ऐकायला येते की नाम संकीर्तन?

अलीकडे तर असा समजच दृढ झाला आहे, की सामान्य माणसाला भूमिका असूच शकत नाही. त्यांनी भूमिका मांडली की तो कोणाचा तरी चमचा अथवा भक्त आहे. ही आपल्या लोकशाहीची अधोगती आहे असे वाटत नाही? सामान्य माणून फक्त शासनाला कर देण्यासाठी, सभेला मूक प्रेक्षक म्हणून उपस्थित राहण्यासाठी किंवा अमूक तमूक की जय, एवढेच म्हणण्यासाठी आहे का? नेत्यांना भूमिका असू शकते पण लोकांना भूमिका असू शकत नाही का? एखाद्याच्या विरोधात भूमिका घेणारा त्याचा वैयक्तिक शत्रू असतो का?कुणाल कामरा याच्या टिकेने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्याच्या विरोधात सुरू असलेल्या कारवाईमुळे यापुढे नाव न घेता केलेली टिका-टिप्पणीसुद्धा गंभीर प्रमाद मानला जाणार आहे. कायदेशीर लढाईला सामोरे जाण्याची इच्छा नसलेले असंख्य लोक आहेत. ते यापुढे अभिव्यक्ती स्वातंत्र्य इत्यादी शब्दांचा उच्चार सुद्धा करणार नाहीत. यातून 'हो' ला 'हो' करणाऱ्यांची आणि जे दिसते आहे ते अलौकिक, अद्भूत आहे, असे मानणाऱ्यांचा संप्रदाय तयार करण्याची प्रक्रिया सुरू राहणार आहे. आताचा काळ हा दोनच वर्गात लोक गणले जाण्याचा काळ आहे. एकतर तुम्ही कोणा एकाचे विरोधक असता किंवा त्याच्या विरोधकांचे समर्थक असता. कोणी 'तटस्थ' असू शकते, सामान्य नागरिक म्हणून व्यक्त होऊ शकते, असे मानण्याचा हा काळच नाही. कशाचीही व्याख्या आपापल्या सोयीने ठरविण्याचा व अंमलात आणण्याचा हा काळ आहे.अमेरिकेची पायाभरणी करणाऱ्यांमध्ये अग्रस्थानी राहिलेले बेंजामिन फ्रॅंकलिन यांचे 'जे लोक तात्पुरत्या सुरक्षिततेच्या बदल्यात अत्यावश्यक स्वातंत्र्य सोडून देतात ते स्वातंत्र्य वा सुरक्षितता या दोन्हींसाठी पात्र ठरत नाहीत', अशा आशयाचे विधान आजही तेवढेच चिंतनीय आहे. आम्हाला आमच्या देशाचा, पुढच्या पिढ्यांचा काही विचार करायचा नसेल तर आज जे चाललेय ते बरेच, असे म्हणावे लागेल.कुणाल कामराच्या विधानांना कितपत महत्त्व द्यायला हवे, असे म्हणणारेही खूप आहेत. तो जे बोलला ते ठाकरेंचे शिवसैनिक बोलत होतेच. पण त्यांना प्रत्युत्तर देण्यात काही मर्यादा असाव्यात. राग या सैनिकांविरोधात पण पुढे आला कामरा, असे काहीसे दिसत आहे.

# वसईतील पत्रकारांचे आंदोलन...पान१

शिष्टमंडळाला आयुक्तांच्या दालनात जाऊन चर्चा करण्याचा आग्रह केला. मात्र तो पत्रकारांनी फेटाळून लावला. जोपर्यंत आयुक्त वा तत्सम अधिकारी येत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही, अशी कडक भूमिका पत्रकारांनी घेतली.

## महापालिकेकडून दिलगिरी

अखेर अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे यांनी खाली येऊन पत्रकारांशी चर्चा केली. ही यादी अधिकृतपणे प्रसारीत केली नसल्याचे त्यांनी सांगितले. पत्रकारांची बदनामी करण्याचा उद्देश नाही तसेच महापालिका पत्रकारांच्या विरोधात नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. अधिकाधिक कर संकलन व्हावे, यासाठी सर्वांच्या याद्या प्रसिद्ध केल्या असल्याचा दावा त्यांनी केला. पत्रकारांच्या यादीत चुकीची माहिती गेली असल्याबद्दल त्यांनी दिलगिरी व्यक्त केली. यापुढे अशी चूक होणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. यानंतर दोन तासांनी आंदोलन मागे घेण्यात आले.

# शिक्षण व आरोग्य यांच्याकडे ...पान नं.१

सुभाष भागडे उपस्थित होते.जिल्ह्यात सुरू असणाऱ्या व सुरू होऊ पाहणाऱ्या प्रकल्पाच्या दृष्टीने पावसाळ्यापूर्वी करावयाच्या कामांकडे आपण आगामी काळात लक्ष देणार असून या आठवडा अखेरीस पुण्यात होणाऱ्या जिल्हाधिकारी यांच्या परिषदेत शासन स्तरावरून नेमून देण्यात येणाऱ्या प्राधान्य कामांच्या दृष्टीने लक्ष देण्यात येईल असे त्यांनी सांगितले.जिल्हा नियोजन विकास निधी अंतर्गत होणाऱ्या कामांवर झालेल्या खर्चाचा आढावा घेणार असल्याचे सांगत त्यानंतर तालुका स्तरावर असणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी स्वतंत्र बैठका घेऊ असेही त्यांनी सांगितले.जिल्ह्यात आरोग्याची समस्या महत्त्वपूर्ण असून मनुष्यबळाची मर्यादा असल्याने उपलब्ध कर्मचारी व अधिकाऱ्यांना प्रशिक्षित करून त्याला रुग्णांचे चांगल्या पद्धतीने निदान करण्यासाठी तयार करण्यावर आपला भर राहील असेही त्यांनी सांगितले. जिल्ह्यातील सामान्य रुग्णालय व ट्रॉमा केअर सेंटर लवकरात लवकर सुरू करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी लक्ष द्यावे अशी सूचना पत्रकारांनी केली. जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी आपला यापूर्वी देखील प्रयत्न राहिला असून हे काम पालघर मध्ये सुरू राहील असे त्या पुढे म्हणाल्या.मुंबई राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरण दरम्यान पालकमंत्री महोदयांनी निदर्शनास आणून दिलेल्या त्रुटी, पालघर घोटी सिन्नर राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरण व मजबुतीकरण संदर्भातील प्रश्न, सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा परिषद ग्राम विकास विभाग पर्यटन इत्यादी विभागांकडून एकाच कामाची दुबार देयक काढण्याबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांवर आपण गंभीर असून दुबार देयके अदा करण्यात येऊ नये यासाठी व्यवस्था उभारू असेही त्यांनी पत्रकारांना आश्वासित केले. जिल्ह्यात व विशेषता पालघर व वाडा प्रदूषणाची गंभीर समस्या असून त्यावर तोडगा काढण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या स्थानीय अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक आयोजित केली

# जनसुरक्षा कायद्याविरोधात पत्रकार..पान नं.१

पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.'पत्रकारांच्या स्वातंत्र्याची मुस्कटदाबी आम्हाला मान्य नाही!' असे सांगत मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण म्हणाले, सरकारने अशी मनमानी करू नये. तर एस एम देशमुख म्हणाले, पत्रकार संरक्षण कायदा व्हावा म्हणून जशी आम्ही आंदोलन केली तशी पुन्हा होऊ नये यासाठी आम्हाला भाग पाडू नका, तर जेष्ठ पत्रकार महेश म्हात्रे म्हणाले, सरकार विरोधास पडलेली ही आंदोलनाची ठिणगी भडका होण्याअगोदर सरकारने गांभीर्याने विचार करावा, जेष्ठ पत्रकार किरण नाईक म्हणाले, आता आम्ही मागे हटणार नाही, तर जेष्ठ पत्रकार दिलीप सपाटे म्हणाले, हे विधेयक पत्रकार विरोधी असल्याने तीव्र विरोध करावा लागेल.जेष्ठ पत्रकार दिवाकर शेजवळ म्हणाले, जनतेवर अंकुश ठेवायची भीती का वाटते, प्रवीण पुरो म्हणाले, सर्व पत्रकारांनी सरकारला पत्र पाठवत विरोध करावा लागेल, संपादक शैलेंद्र शिर्के म्हणाले, आपण सर्वांना न्याय देण्यासाठी आवाज उठवून बातमी करतो. आपणास आता आपल्यालाच न्याय द्यायचा आहे. प्रेस क्लबचे पदाधिकारी सौरभ शर्मा म्हणाले, ही लढाई आता तीव्र केल्याशिवाय पर्याय नाही, मिलिंद अष्टिवकर म्हणाले, ईडी, सीबीआय झाली आता हे विधेयक आणले आहे, पत्रकार विनोद साळवी म्हणाले, तुळशीदास भोईटे म्हणाले, पत्रकारांनी अशी एकजूट अजून दाखवली पाहिजे. बृहन्मुंबई महानगरपालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष मारुती मोरे म्हणाले आता आंदोलनाची ही सुरुवात आहे. सरकारने अंत पाहू नये.'हा कायदा पत्रकारांच्या हक्कांवर घाला घालणारा आहे. जर तो लागू झाला, तर पत्रकारांवर अनेक निर्बंध येतील आणि सत्य बाहेर आणणे कठीण होईल.' या कायद्यामुळे सरकारला कोणतीही बातमी 'राष्ट्रहिताविरोधी' असल्याचे सांगून हटवण्याचा अधिकार मिळणार आहे. तसेच, सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमांवर देखील बंधने लादली जाण्याची शक्यता आहे. असे संदीप चव्हाण यांनी सांगितले.यापूर्वीही पत्रकारांवरील नियंत्रण वाढवण्याच्या प्रयत्नांना विरोध झाला होता. मात्र, यावेळी पत्रकार संघटनांनी एकत्र येत सरकारविरोधात मोठे जनआंदोलन उभे करण्याचा निर्धार केला आहे. संघटनांनी स्पष्ट केले आहे की, जर सरकारने कायदा मागे घेतला नाही, तर देशव्यापी आंदोलन छेडले जाईल. यासाठी सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचाही विचार केला जात आहे. सरकारकडून अद्याप या मागण्यांवर अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र, विरोध वाढत असल्याने लवकरच काही स्पष्टीकरण मिळण्याची शक्यता आहे.

# ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांचे निधन



मुंबई :- ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार (वय-८७) यांचे निधन झाले आहे. त्यांनी मुंबईतील कोकिलाबेन धीरूभाई अंबानी रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. मीडिया रिपोर्ट्सनुसार, प्रदीर्घ काळापासून मनोज कुमार आजारी होते. प्रकृती अस्वास्थामुळे काही दिवसांपूर्वीच त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलेलं. मनोज कुमार यांना भारतीय चित्रपटसृष्टीत 'भरत कुमार' म्हणून ओळखलं जातं. त्यांच्या निधनामुळे सिनेसृष्टीसह संपूर्ण देशात शोककळा पसरली आहे.हिंदी चित्रपटसृष्टीला अनेक उत्तम चित्रपट देणारे बॉलिवूडचे सुपरस्टार मनोज कुमार यांनी आपल्या चित्रपटांमधून लोकांना पडद्यावर देशभक्तीची खोल भावना अनुभवायला लावली. मनोज कुमार हे हिंदी चित्रपटांमध्ये देशभक्त अभिनेत्याचा चेहरा म्हणून ओळखले जायचे. असं म्हटलं जातं की, भगतसिंग यांच्यावर या अभिनेत्याचा खूप प्रभाव आहे आणि त्यांनी 'शहीद' सारख्या देशभक्तीपर चित्रपटांमध्ये काम केलं आणि अनेकांसाठी प्रेरणास्थान बनले. मनोज कुमार देशभक्तीपर चित्रपटांसाठी ओळखले जातात. त्यांच्या कारकीर्दीत त्यांनी केलेल्या देशभक्तीपर चित्रपटांमुळेच त्यांना बॉलिवूडमध्ये 'भारत कुमार' म्हणून ओळख मिळाली. मनोज कुमार यांना १९९२ मध्ये पद्मश्री आणि २०१५ मध्ये दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं होतं. मनोज कुमार यांचा राजा खोसला यांचा १९६४ मधला मिस्ट्री थ्रिलर असलेला 'वो कौन थी?' सुपरहिट ठरला. या चित्रपटातील 'लग जा गले' आणि 'नैना बरसे रिमझिम' ही गाणी प्रेक्षकांनी डोक्यावर घेतली. ही दोन्ही गाजलेली गाणी लता मंगेशकर यांनी गायली होती. मनोज कुमार यांचे वह कौन थी, पूरब और पश्चिम, शोर, हरियाली और रास्ता, गुमनाम, शहीद, पत्थर के सनम, सावन की घटा, क्रांति हे सिनेमे अत्यंत सुपरहिट ठरले. शहीद सिनेमातील त्यांच्या शहीद भगतसिंहांच्या भूमिकेचं तत्कालिन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनीही कौतुक केलं होतं. मनोज कुमार यांनी 'सहारा' (१९५८), 'चांद' (१९५९) आणि 'हनीमून' (१९६०) सारख्या चित्रपटांमध्ये काम केलं आणि त्यानंतर त्यांना 'कांच की गुडिया' (१९६१) मिळाला ज्यामध्ये ते पहिल्यांदाच मुख्य भूमिकेत दिसले. यानंतर 'पिया मिलन की आस' (१९६१), 'सुहाग सिंदूर' (१९६१), 'रेश्मी रुमाल' (१९६१) हे चित्रपट त्यांनी केले. १९६२ मध्ये विजय भट्ट यांच्या 'हरियाली और रास्ता' या चित्रपटानं त्यांना सर्वात मोठं यश मिळालं, जो व्यावसायिकदृष्ट्या हिट ठरला. या चित्रपटात माला सिन्हा होत्या. 'हरियाली और रास्ता', 'शादी' (१९६२) च्या यशानंतर 'डॉ. विद्या (१९६२) आणि गृहस्थी (१९६३), या तिन्ही चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली.




वसई: वसई-विरार महानगरपालिकेने पत्रकारांच्या घरपट्टी शुल्काची यादी व्हायरल केल्याने मोठी चर्चा सुरू झाली आहे. मात्र, शहरातील कचरा वाहतूक करणाऱ्या ठेकेदारांची यादीही तितकीच महत्त्वाची आहे.वसई-विरार आणि नालासोपारा भागात वापरण्यात येणारी कचरा वाहने जुनाट आणि धोकादायक झाली आहेत. या कालबाह्य वाहनांमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आहे.

तरीही, संबंधित यंत्रणा दुर्लक्ष करत असल्याचे दिसते.महानगरपालिकेने आता पारदर्शक कारभार करत ठेकेदारांची संपूर्ण माहिती, त्यांच्या गाड्यांची स्थिती आणि संबंधित कंत्राटे सार्वजनिक करावीत. नागरिकांना योग्य माहिती मिळाली, तर शहराचा विकास आणि सुरक्षितता दोन्ही शक्य होईल.







पुणे : संविधान हक्क परिषद व मंत्रालय वार्ता यांचे वतीने इंजि. पांडुरंग शेळार, माजी कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे यांना नुकतेच मा. शरदचंद्रजी पवार साहेब यांचे हस्ते समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. श्री. शेळार यांनी सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रात केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना 'सन्मानचिन्ह' देवुन गौरविण्यात आले.

यशवंतराव चव्हाण सभागृह, मंत्रालय, मुंबई येथे हा गौरव समारंभ दिनांक 29 मार्च 2025 रोजी पार पडला.

या कार्यक्रमास राष्ट्रवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार मा. शरदचंद्र पवार, मा. खासदार चंद्रकांत हंडोरे, ॲड अनिल अहिरे, महागायिका निशाताई भगत, डॉ. संजीवनी कांबळे, इंजि. पांडुरंग शेळार आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जगातील एक आदर्श संविधान निर्मिती केली. त्यामुळे श्रीलंका, चीन व पाकीस्तानच्या तुलनेत भारत देश एकसंघ व सुरक्षित ठेवण्याचे काम भारतीय संविधानाने केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून न्याय व मूलभूत हक्क भारतीयांना बहाल केले असले तरी देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाली तरी सर्व सामान्यांना अद्यापही त्यांच्या मूलभूत न्याय व हक्कापासून वंचित रहावे लागत आहे ही दुर्दैवाची बाब असल्याची खंत मा. शरदचंद्र पवार साहेब यांनी आपल्या भाषणात व्यक्त केली. दामोदर खोरे विकास प्राधिकारणाची स्थापना तसेच भाक्रानांगल धरणाची निर्मिती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली त्यामुळे पंजाब, हरियाणातील ९८% क्षेत्र ओलीताखाली आलेले आहे. संविधान निर्मिती पान न.3

## युवाशक्ती एक्सप्रेस कार्यालय- ९८९०८७९७५७

वृत्तपत्रात प्रसिद्ध होणारा मजकूर आलेल्या कागदपत्रांवर आधारित असतो. त्यामुळे प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत कोणाला आक्षेप असल्यास संबंधितांनी योग्य त्या कागदपत्रांसह **युवाशक्ती एक्सप्रेस** कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर पुरावे योग्य असल्यास संबंधित बातमी बाबतचा खुलासा प्रसिद्ध केला जाईल. या पत्रात प्रसिद्ध होणा-या मजकुराला मुद्रक स्थळ जबाबदार राहणार नाही.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस मते प्रसिद्ध होणा-या कोणत्याही प्रकारच्या जाहिरातीबाबत कुठल्याही प्रकारचा वाद उद्भवल्यास त्याला युवाशक्ती एक्सप्रेस व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वृत्त प्रसिद्धी किंवा अन्य कोणत्याही तत्सम कामासाठी संपादकाशी संपर्क साधायचा असल्यास संबंधितांनी दूरध्वनी कमांक ९८९०८७९७५७ वर संपर्क साधावा.

या नोटीसी द्वारे कळविण्यात येते कि साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणा-या जाहिराती सर्व प्रकारच्या नोटीसी याच्याशी आमचा काहीही संबंध नाही. संबंधित आणि संबंधित व्यक्तीशी परस्पर संबंध साधून त्याबाबत खात्री करावी. साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्र व व्यवस्थापन याला कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

संपादक..

Printed,Published And Owned Tushar Rajratna Gaikwad,printed At Vava ArtsB/8 Dronagiri CHS.,Tanki Road Tulinj (E) Tal-Vasai 401209,Published From Room No.10 Kadarbhai Chawl Sarvoday Vasahat Tnki Road Nallasopara (E) Tal--Vasai Dist-Palghar-401209.Editor-tushar Rajratna Gaikwad
RNI NO.MAHMAR/2016/72543. Mobile-9960144348,9890879757,yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक म्हणून तुषार राजरत्न गायकवाड रु. नं. १०, कादरभाई चाळ, सर्वोदय वसाहत, आंबेडकर नगर, टाकीरोड, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९. ता. वसई, जि. पालघर, येथे प्रकाशित होऊन ९८९०८७९७५७ मे. बाबा आर्टस् बी.०८, मथुरा नगर, द्रोणगिरी अपार्टमेंट, टाकी रोड, साई बाबा मंदिर जवळ, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९ जि. पालघर, महाराष्ट्र येथे मुद्रित करणयात आले. मोबाईल नं. ९९६०१४४३४८
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद वसई न्यायालयाच्या कक्षेत) Email:yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in